# बोदवड महाविद्यालयात वाणिज्य व नियोजन मंडळाचे उदघाटन

## “डिजिटल पेमेंट सिस्टीम” या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

बोदवड महाविद्यालयात प्राचार्य डॉ.अरविंद चौधरींच्या अध्यक्षतेखाली मा.डॉ.एस.जे.साळुंके (शेंदुर्णी महाविद्यालय) यांच्या हस्ते वाणिज्य व नियोजन मंडळाचे उदघाटन करण्यात आले; सदर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य,वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

उदघाटन प्रसंगी डॉ.साळुंके यांनी “डिजिटल पेमेंट सिस्टीम” या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कॅशलेस व्यवहार वाढण्यासाठी डिजिटल इंडिया / कॅशलेस इंडिया कसे निर्माण होईल? हे व्यवहार कसे फायदेशीर ठरतील? कारणे आणि परिणाम १९८० पासून डिजिटल व्यवहारासंबंधी प्रयत्न चालू असून देखील अजूनही भारतात डिजिटल व्यवहार १००टक्के झालेले नाही. आज प्रत्येकाला आपल्या स्मार्ट फोनच्या सहाय्याने सर्व व्यवहार पे.टी.एम.,ए.टी.एम.च्या माध्यमातून करू शकतात.वित्तीय समावेशान मध्ये ४२टक्के पेक्षा अधिक जनतेची बँक खाती नाहीत.त्यांना बँक व्यवहारात आणणे गरजेचे आहे. बंधन बँक, ऑल स्मॉल बँक सारख्या बँकिंग,फायनान्सीयल कंपनी ग्राहक सेवा केंद्र या माध्यमातून कॅशलेस व्यवहार करता येतात.प्लास्टिक मनीच्या स्वरुपातATM,डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड,travel kard,प्रिपेर कार्ड,USSD,AEPS,UPI Mobile Wallets,POS अश्या सुविधा विकसित झालेल्या आहे

उदा.HDFC ची Pay App सुविधा, ICICI चे PACKETS, SBI चे SBI Buddy सदर प्रसंगी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौहारी, उपप्राचार्य डी.एस.पाटील वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ.एस.एस.काठोके,डॉ.पी.एस.महाले अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. श्रीमती एच.एम.कोटेचा, वैभव कासार व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले